# पं. मनोहरराव कासलीकर : एक स्वरमय व्यक्तिमात

संगीताच्या दृष्टीनं अमरावती हे एक आतिशय संपन्न सदर आहे. हया एकाच गावात आकाशवाणीच्या अ श्रेणीचे पाचन्महा मान्यताप्राप्त कलावंत राहतात. इथे संगीताचे कार्यक्रम घडवणाऱ्या अनेक संस्था आहेत. अनेक नामवंत, गुणी कलाकार त्या नगरीत आवर्जून आपली कला सादर करतात. नव्या होतकरू कलाकाराला उत्तेजन देणारी, त्याला स्टेज उपलब्ध करून देणारी छोटी मंडळंही गावात आहेत. स्या इथल्या लोकांनी गाणं भरपूर ऐकलं आहे. इथे मनापासून वाहबा देणारे दर्दी रसिक तर आहेतच पण त्याचबरोबर पररखडपणे रीका करू शकणारे जाणकार व चोखंदळ श्रोतेही आहेत. ह्या गावात गावाचे शिक्षण देणम्या गायनशाल नि महाविद्यालय आहेत. मनोभावे संगीताची साधना करणारी काही घरं आहेत. संगीतावर नि एकूणच कर्लावर हक्काने चर्चा करावी अशा काही व्यक्ती आहेत. एकंदर

या अमरावतीत गाण्याचे 'वातावरण' आहे. असे गाण्याचं हे वातावरण जाणीवपूर्वक तथार निर्माण

करण्याचे श्रेय अनेकांच्या वाट्याला जातं. यात मोलाचा वाटा गुरुवर्य पं. मनोहरराव उपाख्य बाळासाहेब कामलीकरांचा आहे. कासलीकर कार्कांना मी माझ्या लहानपणापासून बघते, रोकते आहे. आमच्या घरात पूर्वीपासूनच अनेक छोथ्या बैठकी होत. बैठकी

होत. समोरच्या खोलीतल्या भामानाची अंगनात हकालपरी व्हायची, खोलीत सतरंज्या अंयरल्या जायच्या, जुजबी सजावर व्हायची, वाद्यांची जुळवाजुळव व्हायची नि छोटेखानी बैठक रंगायची. गावातल्या नि बाहेरच्याही कलाकारांच्या कित्येक बैठकी आमच्या घरात होत. आमच्यासारख्याच

आणखी काही घरांमधून कधी मैफिली होत. घरातल्या घरात दाटीवाटीन बसलेल्या उत्सुक श्रोत्यांनी कासलीकर कार्काच गाणं कित्येकदा ऐकूलं आहे.

माझे आईवडिल, मी प्रभाम्ही भावंडं, मम्मे आई आम्ही सगळे काकांचे शिष्य आहोत त्यांच्या गाण्याचे चाहते आहोत, ढ्या गाण्याने आमच्यावर लहानपणापासून खोलवर संस्कार केले आहेत.

कार्काच्या छायानट, केदार, गौड मम्हार, जौनपुरी, तोडी, दुर्गा, देसन आमची अभिरुची घडवली आहे. खरं तर आमच्या घराची सांगीतिक आवडच कार्काच्या गाण्यावर जोपासली गेली आहे. आमची सांगीतिक जाणीव काकांच्या गाण्यावर पोसली गेली आहे. कार्काच्या गाण्याच्या छायेतच. आमचे घर के घडले आम्ही घडलो, वादलो, बहरको आहोत.

कार्काचं गाणं आम्ही भरपूर ऐकम आहे. काका घरी आले की काहीतरी स्वास ऐकवायचे, गप्प्यांमधे तंबोरे निघत, मग काका ते काहीतरी खाम ऐकवत. काहीतरी खाम शिकवत. वडिर्लाना, त्यांच्या इतर शिष्यर्थ्यांना शिकवताना आम्हा भावंडांच्या कानावर अनेक बंदिशी पडत, खेळता खेळता पाठ होत, भूपाली, यमन ची ओळख होतांनाच देवगांधार, सूहा, मधमाद सारंग ढ्या अनवट - अश्मलित रागांशीही परिचय होत गेला. कधीतरी हयातल्या काही जागा नकलेखातर काढता काढता आम्ही त्यात रमत गेलो. नकळत कानावर पडणार गाणं झिरपत मनात केव्हा उतरलं ते कळलेही नाही.

पु.ल. देशपांडे ब्यांनी मान्लकार्जुन मन्सूर स्याँच वर्णन एक गाण्यात राहणारा माणूस' असं केले होते. कारण हे वर्णन कार्कानाही तंतोतंत लागू पडते. कोको र विविध मार्गानी अजूनही गाण्यातच असतात. त्यांचं हे गाण्यात असण त्यांच्या घरातल्या वर्तमानपत्रावरून दिसते. सकाळी विविध बातम्यांसाठी घरात आलेल्या वर्तमानपत्रांना संध्याकाळपर्यंत तानांच्या हरकतींच्या नोटेशन्सच्या

चौकटरी लाभलेल्या असतात घरी आलेल्या लग्नांच्या पत्रिकांच्या मागच्या बाजू विविध वजर्नाच्या, कावेगळ्या मार्गापासून सुरु होणाऱ्या तार्नानी निहायांनी सजनेम्या असतात. बँकेत, पोस्थत, डॅक्टरांकडे गेल्यावर आपला नंबर येईपर्यंतचा वेळ काकांना कधीच कंराळवाणा होत नसावा, रांगेत उभे असताना काही सुचले की मिळेल त्या कागदाच्या तुकड्यावर, एखाद्या पावतीच्या मागे काका ते लिहून ठेवतात. असे कागद मग दस्तऐवज बनतात. त्या कागदावरच्या स्वरांना यथावकाश वहीत उत्तरखने जाते पण तरीही त्या तुकड्याचं महात्म्य भरत नाही त्या छोय्याश्या तुकड्यावरच्या लिहिण्याची ही सुखात ।। श्री ।। नं झालेली असते आणि शेवटी बारीकशा अक्षरात तारीख आणि वेळ घातलेली असते. हरकत मिटून काढण्याआधीची बेचैनी ।श्री।'तून प्रकरते आणि निहून काढल्यानंतरचे समाधान तारखेतून झळकत

नोटेशन करणे हा त्यांचा आवडता छंद आहे स्वतःचं गाणं त्यांनी स्वरलिपीबद्ध करून ठेवले आहे. कार्काजवळ जबरदस्त प्रतिमा आहे. पण प्रतिमेइतकाच त्यांचा अभ्यासावर विश्वास आहे. गाताना एखादी जागा नकळत येऊन जाते. वेगबंच सौंदर्य निर्माण करून दाद मिळवून जाते. गाण्यात बेशवस्य रंग भरून जाते. काका एवढ्यावरच थांबत नाहीत. त्या सौंदर्यपूर्ण जागेचं विश्लेषण करू लागतात. त्या जागेत कशाचं सौंदर्य आहे ? ते कशामुळे आले? याचा व ते विचार करू लागतात. यापुढे जाऊन वे मौर्य नकळत आलेल्या त्या मौदर्याना जाणीवपूर्वक कुच्य पन बेमालूमपणे पुन्हा आणायचं असेल तर ते कर्म साधता येईल याचा ते शोध घेऊ लागतात. संगीताच्या क्षेत्रात अभावानेच सापडणारी विलक्षण चिकित्सक, भेदक, विश्लेषक दृष्टरी काकांच्यात सापडते.

म्हणूनच सैल, विस्कळित, बेंगरुळ, अडखळत्या, अस्ताव्यस्त हरकती त्यांना खपत नाहीत. नेमक्या चपखल, बांधेसूद, काटेकोर अभ्यासपूर्ण गाण्यावर त्यांचा भर आहे. नेटकेपणाचे त्यांचे प्रेम त्यांच्या चपखल बादशीमधून दिसत. त्यांच्या अभ्यामपूर्ण गायकीची साम त्यांच्या रागरंग हया पुस्तकातून मिळते. 'रागरंग 'मधे परंपरागत ख्यानांचा नव्या गायकीच्या संदर्भात पुनर्विचार आहे.

त्यात मात्रामात्रांच्या दिशोबाच्या ताना आहेत. कावेगळ्या वजनाच्या जैल लयीचे डौन त्यात लिहून उलगडून दाखवले आहेत. लिहून दाखवले आहेत. कॅमेरमधे गाऊन दाखवले आहेत. स्वतःच्या गायकीची उकल करून दाखवण्यास कार्काचे कसब नि त्यामागची तळमळ संगीतमेवात फारच कमी दिसते.

कासका पं. मनोहरराव कासलीकर हे आग्रा घराण्याचे गायक आहेत. उ. बडे गुलाम अली खाँचे ते गंडाबच शागीर्द आहेत. अठरा महिने रोज पंधरा ताम त्यांना बडेगुलामभालीचा सहवास लाभला. त्या कानात त्यांना अनेक बंदिशी मिल्या,

गायकीचा इंगही शिकायला मिळाला. त्या काळबहन ने अतिशय भरभरून सांगतात. पण खरं तर काका यह स्वतःचे स्वतःच घडले आहेत असं जाणवते. आकार त्यांच्यावर अनेकांचे प्रभाव जाणवतात. कार्कानी अनेकांचे प्रभाव जाणीवपूर्वक जोपासले आहेत. उ. निभार हुसैन खाँच्या गाण्यावर त्यांनी मनापासून प्रेम केले. एकलव्याच्या निष्ठेने ऐकून ऐकून ती गायकी आत्मसात केली छोरा गंधर्वांकडून त्यांनी काही काळ तालीम घेतली. त्याचबरोबर मा.दीनानाथ, 3. विलायत हुसैन खाँ, निवृत्तीबुवा सरनाईक, वभेवुना हांचेही ठेवून संस्कार घडवले. वास्तविक गुरुशिष्य परंपरेन राहून तालमीना अनन्यसाधारण महत्त्व देण्याचा तो काळ होता. परंतू त्या रूढ मागीन न जाता काकांनी स्वतःला विचारपूर्वक घडवले यात त्यांचे वेगळेपण आहे. आजही नव्या जुन्यांचे गाणं काका नियमित ऐकतात. त्या गाण्याला अभ्यासतात, कुमारर्जीच्या गाण्याला वेगवेगळे छेद देऊन पाहतात, मल्लिकार्जुनाना पिंजून काढतात.

बंदिश नटवणं' ही कार्काची खासियत. हरवाया चीजेची मांडनी ते वेगवेगळ्या अविभवांत करतात की चीज एकप्याचा लांचा ढंग त्या चीजेचे सोने बनवून शकतो त्या चीजेतल्या शब्दातले, काव्यातले भाव ते जोपासतात. चीजेतल्या स्वरसंगती ते मोहकपणे पुढे आणतात. लबीचे जैम अनेक मार्गानी प्रभावी करतात, मात्रांशी नि त्यांच्या वजनांशी खेळतात. मात्र या सगळ्या मांडणीत

बंदिशीची अभिजातता कुठेही कमी हलमार नाही ब्याबाबत ते दक्ष असतात. की बंदिश त्यातले 'शास्त्रीयत्त्व 'जपून कशी मांडानी त्याचे ते उत्कुष्ट उदाहरण असतं. त्यात भाव असतो यप शब्दाच्या अंगानी गेल्याने ती खुमरीकडे झुकणार नाही ल्याबाबत ते जागरूक असतात. त्यात लय असते, लयीशी, तालाशी खेळ असतो. पण त्या खोलत वाहावत न जाण्याची खबरदारी ते घेतात. रागाची शास्त्रीयता त्यात असते पण शास्त्राची योग्य ती बूज राखण्यावर त्यांचा भर असतो. साखाचे नियम सरकवा सचक सस्कार नाहीत. में बोजड होनार नाहीत अथा तन्हेने ते त्या नियमर्मांना हात घालतात. एका मैफिलीत एका रागात वेगवेगळ्या ढंगाच्या बंदिशी पेश करणे ही त्याची सियत आहे.

काका मैफिलीचे गायक आहेत. "मी स्वतःसार्ग गातो" त्यापेक्षा 'मी तुमच्याभाठी गातो" असा परमुखाय माव त्यांच्या गाण्यात आधिक जाणवतो. " मी माझ्यापरीनं मांडव्याचा प्रयत्न करतो, गोड मानून घ्या" असा नम्र भाव कधी असतो तर कधी "या । आता मी तुम्हाला ऐकवतो!! असा रास्त अभिमानही त्यांच्या बैठकीतून आणवतो. डोकावतो. स्वका हजारोंनी असलेल्या श्रोतुसमुदायाला कसं बांधून ठेवायचे हे त्यांना माहीत आहे. समोर बसलेल्या पाचपंचवीस जाणकारांना कसं खुलवायचे हेही ते जाणतात. समोर तरस्य मुद्रेने बसलेल्या श्रोत्याकडून त्याच्याही नकळत वाहवा कशी काढून घ्यायची ब्याचं उत्कृष्ट तंत्र त्यांना साधले आहे. समोरचा श्रोता जाणकार । दर्दी असला की काका खुलतात. नवनव्या खुब्यांनी त्याला रमवतात. समोरचा श्रोता जाणकार नसला की काका त्याला गाणं समजावून सांगतात. गातागाता बोलून त्याच्याशी संवाद साधतात. ही जागा वझेबुवांची हे मास्टर कृष्णराव असो रङ्कन्या बारकावे सांगतात. किंवा ही सातव्या मात्रेपासूनची तिहाई बधा नि तीच निहारी नवव्यापासून बेदम कशी येते ते बघा ! असं सांगून श्रोत्यातनं नि सौदर्य उलगडून दाखवतात. नि मग पुन्हा गातात तेव्हा आअक आपि काका आणि श्रोता हयांच्यातले अंतर गळून पडतं. मैफिल जिर्वत भासते. गातागाता हार्मोनियममधल्या प्रतिसादासाठी थांबतात, कधी गातागाता तबनियाच्या याखेना राकी देनात तेव्हा रंगमंच सजीवंत भासते. काका मैफिलीचे गायक आहेत असं त्यामुळेच म्हणावस वाटतः एक गायक, एक कलाकार, एक गुरु

नि एक अभ्यासक ह्या सर्व बाजूंनी पं. मनोहरराव कासलीकर हे एक अत्यंत श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व आहे. दुदैवाने कर्जाच्या क्षेत्रात श्रेष्ठतेचे निकष निश्चित नाहीत.

लोकप्रियता नि श्रेष्ठता किंवा प्रसिद्धी नि गुणवत्ता त्यांचा संबंध जोडल्यामुळे पं. मनोहरराव कामलीकरांची श्रेष्ठता परायला बराच काळ जावा लागला आहे. आता वयाची पंच्याहत्तरी पार केल्यानंतरही गाण्यातच रमणाऱ्या या कलाकाराची श्रेष्ठता तखाद्याला पटली नसेल तर ते त्याचे प्रचंड नुकसान आहे, हे निश्चिती